**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे शपथपुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव – संजय जयवंत घाडी , वय – ५१ वर्षे,

व्यवसाय – शेती

रा. – पोयरे, ता. देवगड

**शपथेवर सरतपासणी सरकारतर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एम.जी. काळदाते यांचे मार्फत.**

०१. घटना अंदाजे एक वर्षापुर्वी घडली. मी स्वत:ची जमिन ट्रॅक्टरने नांगरत होतो. घटना दुपारी १२.०० वा. घडली होती. माझ्या जमिनीचे तोंडी वाटप झाले होते. तेथे महेश घाडी देखील नांगरत होता. तेव्हा महेश असे म्हणाला की, हे मला दिले आहे, तु नांगरु नकोस. त्यानंतर आमच्यात झटापट झाली. मी त्याची कॉलर धरली. मी ट्रॅक्टर जवळ गेलो. तो धावत आला व त्याने माझ्या डोक्यात कानाच्या वर डाव्या बाजूला पाना मारला. मला जखम झाली. त्यानंतर मी ३.००वा. हॉस्पिटलला गेलो. तेथे माझ्यावर उपचार झाले. मला सहा टाके पडले होते. त्यानंतर ५.३० वा. नंतर देवगड पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. आता मला दि.१७/०६/२०२५ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे . त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादीस **नि.क्र.पी१/पी.डब्ल्यू १** देण्यात येते. ज्या पान्याने मला मारले तो पाना दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला पाना दाखविण्यात आला. तो तोच आहे. पान्यास **एम.ओ.नं.१** देण्यात येते. आरोपीस पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी न्यायालयात उपस्थित आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपी तर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. ए.एम. माणगावकर यांचे मार्फत.**

०२. घटना घडल्या नंतर मी देवगड येथील रुग्णालयात गेलो. मी देवगड रुग्णालयात आल्या नंतर माझ्या जखमेवर सहा टाके घालण्यात आले असे माझे म्हणणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, देवगड येथील रुग्णालयात केलेल्या उपचारा व्यतिरीक्त अन्य कोणत्याही रुग्णालयात माझ्यावर उपचार करण्यात आलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोयरे येथून

निघाल्यानंतर देवगडकडे येताना मिठबाव प्राथमिक आरोग्य केंद्र व मिठबाव पोलीस दूरक्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी देवगडकडे येताना मिठबाव प्राथमिक आरोग्य केंद्र व मिठबाव पोलीस दूरक्षेत्र येथे गेलो नाही. मी पोयरे येथून निघाल्या नंतर थेट देवगड ग्रामीण रुग्णालय येथे गेलो. हे म्हणणे खरे आहे की, मी पोयरे येथून निघालो मग देवगड पोलीस स्टेशन येथे गेलो व तेथून देवगड ग्रामीण रुग्णालय येथे गेलो असे काही घडले नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, ज्या जमिनीत नांगरण्या वरुन वाद झाला त्या जमिनीच्या सातबाऱ्याला माझे व आरोपी यांच्या कुटुंबियांचे नाव नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील व आरोपीचे वडील हे सख्खे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या व आरोपीच्या दरम्यान गावातील जमिनी वरील वहिवाटी वरुन वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर वाद हे वाटप हद्दीमेरेनिशी न झाल्याने वहिवाटी वरुन आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व माझे एकाच छप्प्राचे सामाईक घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या घरावरुन वाद होऊ लागल्याने मी स्वतंत्र घर बांधले आहे. हे म्हणणे खरे आहे की, जुन्या घरातील माझा भाग तसाच आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला संदिप नावाचा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा भाऊ संदिप व आरोपी यांच्या दरम्यान प्रस्तुत न्यायालयात १२/२०२५ चा दिवाणी झाला होता. हे म्हणणे खरे आहे की , ज्या जमिनीवरुन दावा झाला होता त्या जमिनीचे वाटप करुन तो दावा संपविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, ज्या जमिनी बाबत दावा झाला होता त्या जमिनी वरुन आता काही वाद नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी याचे असे म्हणणे आहे की, आपण सामाईक मिळकतीची हद्दीमेरेनिशी वाटप करुन घेऊ. हे म्हणणे खरे आहे की, असे वाटप करुन घेण्यास आम्ही कधीही संमती दिली नाही अगर सहकार्य केले नाही.

०४. माझ्या व आरोपी दरम्यानची घटना १५ मिनीटे चालली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या परिसरात भात शेतीच्या जमिनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळा पासून १०० ते १५० फूट अंतरावर घाडीवाडी परिसरातील घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी आजुबाजूच्या जमिनीत देखील लोक शेतीची कामे करत

होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी जेथे होता, मी तेथे गेलो व त्यानंतर पुढील प्रकार घडला. हे म्हणणे खरे आहे की, मी तेथे गेल्या नंतर माझ्यात व आरोपी मध्ये धक्काबुक्की झाली. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामध्ये झालेल्या धक्काबुक्कीवरुन मी प्रस्तुतची खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याने मला पाठी मागून पान्याने मारले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, जमिनी वरुन असलेल्या वादातून मी आरोपी विरोधात खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खोटा असून आज मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-

(श्रीकांत एस. पचंडी)
न्यायंडाधिकारी वर्ग-१, देवगड

दि.०७/०७/२०२६